- संशोधन आराखडा -

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड

पीएच.डी. संशोधन करिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाची रुपरेषा

(Synopsis)

- प्रबंध विषय-

"कोरोना-१९ चा समाजावर झालेला परिणाम : एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ: नांदेड)

-संशोधक -

श्री सुबोधकुमार चंद्रकांत सुर्यकर

एम.ए.(समाजशास्त्र)

माता गुजरीजी नगर नमस्कार चौक नांदेड

ता.जि.नांदेड

-मार्गदर्शक -

चव्हाण सुखदेव गोविंदराव

एम.ए.,एफ.फिल, पीएच.डी. (समाजशास्त्र)

माधवराव पाटील महाविद्यालय, पालम

ता.पालम जि.परभणी

समाजशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड

ऑगष्ट २०२४

प्रस्तावना:-

आधुनिक भारतीय समाजातील प्रश्नांचा आपण जेंव्हा विचार करु लागलो तेंव्हा सर्वात प्रथम आपले लक्ष लोकसंख्येच्या प्रश्नाकडे वेधले गेले समाजशास्त्रज्ञ, नियोजनकर्ते, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ,राजकीय नेते, यांना या समस्येने चिंताग्रस्त केले आहे. लोकसंख्यामुळेच भारतीय समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. समास्या म्हणजे असा प्रश्न किंवा अडचणी की ज्यावर काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे असते. लोकसंख्येच्या समस्येतुनच आरोग्याच्या समस्या, पर्यावरणाच्या समस्या, झोपडपट्याच्या समस्या, विस्थापनाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. लोकसंख्या आणि मानवी आरोग्य यांचा फार जवळचा संबंध आहे. कारण लोकसंख्येमुळेच आरोग्यावरील ताणतणाव प्रचंड वाढलेला आहे. जैन धर्मातील “मेरी भावना ” या भजनातील बोलीवरुन आपणास हा ताण तणाव स्पष्ट करता येतो.

!! इति-भिती न्याय नही जगमे दृष्टी समय पर हुवा करे !! धर्मनिष्ठ होकर राजा भी न्याय प्रजा का किया करे !! रोग मेरी दुर्भिक्ष न फैले प्रजा शांती से जिया करे परम अहिंसा धर्म जगत मे फैल सर्व हित किया करे !! वरील ओळी समस्यांना कसे सामोरे जावे हेच शिकवतात लोकसंख्येमुळे आरोग्याच्या समस्या कशा निर्माण झाल्या ? या समस्या समाजात किती पसरल्या ? या समस्याचा समाजावर कसा परिणाम झाला ? व समाजाची घडी कशी विस्कळीत झाली यांचा विचार करण्यासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने “कोवीड-19 या समस्येचा भारतीय समाजावर परिणाम ” अभ्यासनासाठी विषयाची निवड करण्यात आलेली आहे. कोरोना-19 हा आजार चिनमध्ये प्रथम डिसेंबर 2019 च्या पहिल्या आठवडयात आढळुन आला साऊथ चायनातील उहान येथे सिफुड मार्केट माध्यमातुन, प्राण्यापासुन या रोगाची लागण झाली असे सांगण्यात येते हा एक व्हायरस असुन प्राण्यापासुन मानवास झाल्याचे उल्लेख सर्व प्रथम सांगण्यात आले. संसर्गजन्य आजार असल्यामुळे तो संपर्कामुळे एका पासुन दुसऱ्यांना सहजपण होतो असे तज्ञ डॉक्टरच्या सल्ल्याने सांगण्यात येते.

या आजारासंबंधी अनेक तज्ञांचे वेगवेगवेळे मत आहे मनामध्ये भिन्नता जरी असली तरी हा महाभयंकर रोग आहे 1 जानेवारी 2020 ला डॉक्टर लिवनकडे सर्वप्रथम अश्या स्वरुपाचा पेशंट आला परंतु डॉ.लिवन यांच्याकडे शासनाने लक्ष न देता उलट त्यांना अनाठाई अफवा पसरवत असल्या कारणाने अटक करण्यात आली डॉ.लिवन यांनाही संपर्कामुळे हा आजार जडला 7 फेबुवारी 2020 ला त्यांचा मृत्यु झाला नंतर या आजाराने गंभीर स्वरुप धारण केले आणि संपुर्ण जगाला भेडसावनारा महामारीचा आजार ठरला गेला. मार्च 2020 मध्ये शासनाने या आजारास महामारीचा आजार घोषीत केले.

त्या आजाराची एक ते तीन दिवस काही लक्षणे दिसुन येतात त्यात ताप,सर्दी, खोकला, कफ या सारखे अनेक लक्षणे दिसु लागतात त्यात प्रचंड वेगाने वाढ होत असते संपर्क वाढत गेला तर समाजामध्ये हा आजार वाढत जातो त्यामुळे समाजात भीतीदायक वातावरण निर्माण होते. मानसिक ताणतनाव वाढत जाते एकमेकांचा विश्वास नष्टप्राय होतो जगण्याची दिशा बदलत जाते यामुळे बदलत्या मानसिक अवस्थेला समजुन घेणे कठीन जात आहे. प्रत्येकाला मानसिक आधाराची गरज निर्माण होत आहे.

प्रस्तुत संशोधनात कारोना-19 या आजारासंबंधी माहितीचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर या आजाराची लक्षणे कसे आहेत या आजारामुळे कोणत्या समस्या निर्माण झालेल्या आहेत समाजामध्ये कसे परिवर्तन झाले आहे. या आजाराचा समाजावर काय परिणाम झाला आहे. या सारख्या अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यात येणार आहे. म्हणुन प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

1. **अध्ययन विषय**:-

प्रस्तुत संशोधनासाठी "कोरोना-19 चा भारतीय समाजावर परिणाम: एक समाज शास्त्रीय अध्ययन" हा विषय निवडलेला आहे. संपुर्ण जगात कारोना-19 ची लाट सुरु झाली आणि त्यांचे पडसात मानवी जिवनावर सुरु झाले मानवी जिवनच भयावह बनुन गेले मानव हा समाजशिल प्राणी आहे. कारण समुहात राहणे म्हणण्याऐवजी अंतर ठेवुन राहणे हेच ब्रिद वाक्य ठरले त्यामुळे संपुर्ण देश,राष्ट्र, समाज, कुटुंब यांच्या समस्या, वेगळया बनत गेल्या. या समस्या शोधणे व बदललेल्या समाज जिवनाचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

2. **संशोधनाचे क्षेत्र**:- "कोरोना-19 (कोरोना) चा भारतीय समाजावर परिणाम: एक समाज शास्त्रीय अध्ययन " या संशोधनासाठी मराठवाडा हे क्षेत्र निवडलेले आहे या विषयाचे महत्व संपुर्ण जगात जरी असले तरी तेवढया व्यापक पातळीवर अभ्यास करणे शक्य नाही. म्हणुन विषयाला योग्य न्याय देण्यासाठी व वस्तुनिष्ठता आणण्यासाठी मराठवाडयाची निवड कार्यक्षेत्र म्हणुन केलेली आहे.

3. **संशोधनाची व्याप्ती**:-

सामाजिक संशोधनामध्ये संशोधनाची व्याप्ती ठरविणे गरजेचे असते म्हणुन प्रस्तुत संशोधनात वैदीक क्षेत्रातील व समाजातील काही एककांचा अभ्यास करण्यात येणार आहे. मानवी जिवनातील वैयक्तीक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक स्थितीचा/समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

4. **संशोधनाच्या मर्यादा**:-

प्रस्तुत संशोधनात वैदीक आणि मानवी जिवन यांचा अभ्यास करीत असतांना सर्वच घटकांचा किंवा पैलुंचा समावेश केला असला तरी मानवी वर्तनाचा संशोधनात कांही मर्यादा येतात त्यापुढील प्रमाणे,

1) प्रस्तुत संशोधन फक्त मरावाडयापुरतेच मर्यादीत आहे.

2) प्रस्तुत संशोधनात सर्व जिल्यातील समान एकक घेवुन केलेले नाही. कारण रोग्यांची संख्या पाहुन कमी जास्त प्रमाण निवडलेले आहे.

3)प्रस्तुत संशोधनात कांही स्त्रिया व काही पुरुषाचा समावेश आहे त्याचे प्रमाण समान नाही.

5. **संशोधनाचे महत्व**:-

1) कोरोनाची संपुर्ण माहिती मिळवण्यासाठी हे संशोधन महत्वपुर्ण ठरणार आहे.

2) कोरोना-19 संबंधात असणाऱ्या सर्व पैलुंचा अभ्यास करण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

3) कोरोना-19 चा समाज मनावर झालेला परिणाम पाहण्यासाठी महत्वपुर्ण ठरणार आहे.

4) इतर रोगाच्या तुलनेत हा रोग कसा होतो हे समजण्यास सदरील संशोधन महत्वपुर्ण ठरणार आहे.

5) या रोगाचे झालेले परिणाम अभ्यासण्यासाठी हे संशोधन उपयोग पडणार आहे.

6) या रोगासंबंधीची काळजी कशी घ्यावी व अफवावर विश्वास ठेवु नये यासाठी हे संशोधन महत्वपुर्ण ठरणार आहे.

7) रोगासंबंधीची प्रासंगीकता तपासण्यासाठी हे संशोधन महत्वपुर्ण ठरणार आहे.

8) रोग आणि रोगी यांच्यासाठी यांनी काळजी कशी घ्यावी यासाठी महत्वाचे ठरणार आहे.

9) शासन, शासकीय अधिकारी, विविध सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते संशोधन करणाऱ्या संशोधकास हे संशोधन मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणार आहे.

6. **संशोधनाची उद्दीष्ट्ये**:-

कोणत्याही विद्या शाखेतील संशोधन करणे त्या संशोधनाला उद्देश हा असतोच उद्देशाविना संशोधनाला अर्थ ठरत नाही. म्हणुन प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने खालील उद्दीष्टये निश्चित केलेली आहे.

1) कोरोना-19 मुळे समाजावर झालेल्या परिणामचा अभ्यास करणे.

2) कोरोना-19 मुळे मराठवाडयातील मानवी आरोग्याची स्थिती जाणुन घेणे.

3) विस्कळीत समाज जीवनाचा आढावा घेणे.

4) डॉक्टर व पेशंट संबंधाचे परिक्षण करणे.

5) कारोना-19 च्या काळातील मानवी आरोग्याचे परिक्षण करणे.

6) कोरोना-19 मुळे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक जनजिवन जाणुन घेणे.

7) **संशोधनाची गृहीतके**:-

संशोधकाने संशोधनाचे उद्दीष्टये लक्षात घेवुन गृहीतकाची मांडणी केलेली आहे

1) कोरोना-19 मुळे समाजावर विपरित परिणाम झाले आहे.

2) कोरोना-19 मुळे मराठवाडयातील मानवी आरोग्य धोक्यात आले.

3) कोरोना-19 मुळे समाजजिवन विस्कळीत झाले.

4) डॉक्टर व पेशंट यांचे संबंध सौहार्दपुर्ण नव्हते.

5) कोरोना-19 मुळे आर्थिक, सामाजिक घडी विस्कटलेली होती.

8. **संशोधन आराखडा:-**

प्रत्येक संशोधनासाठी संशोधन आराखडयाचे विशेष महत्व आहे. संशोधन आराखडयाचे स्वरुप हे संशोधकाला निश्चित दिशा व आकार प्रदान करते, उद्दीष्टानुसार संशोधन आराखडा निश्चित केल्यामुळे वेळ, श्रम, पैसा, याची बचत होते म्हणुन प्रस्तुत संशोधानासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा व वर्णनात्मक संशोधन आराखडा या दोन संशोधन आराखडया चा वापर करण्यात येणार आहे.

9. **नमुना निवड:-**

प्रस्तुत संशोधानाचा विषय "कोरोना-19 चा समाजावर परिणाम: एक समाजशास्त्रीय अध्ययन " असल्यामुळे नांदेड समग्र निवडण्यात आलेला आहे. नांदेड जिल्हयातील 10 तालुक्यातुन संपुर्ण समग्रातुन 200 उत्तरदाते निवडण्यात आलेले आहेत. संपुर्ण समग्रातुन प्रतिनिधीक स्वरुप म्हणुन प्रत्येक जिल्हयातील एकक निवडण्यात येणार आहे. ते एकक निवडत असतांना रोग व परिस्थिती यावर एकक अवलंबुन असणार आहे. एकक निवडत असतांना रोग्याची संबंधीत घटक याची निवड करण्यात येणार आहे.

ही निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येणार आहे. हि निवड करतांना उत्तरदात्याची जिल्हानिहाय संख्या कमी जास्त येण्याची शक्यता नाकारत येत नाही परंतु संपुर्ण समग्राचा विचार करुन सारखेपणा असल्याचा प्रयत्न आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

10. **तथ्य संकलन**:-

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला अन्ययन साधारण महत्व आहे. प्रस्तुव संशोधानासाठी संशोधक तथ्य संकलनातील प्राथमिक व व्दितीय स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक स्त्रोत:- प्राथमिक तथ्य संकलन म्हणजे संशोधक प्रत्यक्ष संशोधन क्षेत्रावर जावुन मुलाखत, अनुसुची, प्रश्नावली आणि निरिक्षणच्या माध्यमातुन तथ्य संकलित करतो. प्रत्यक्ष संशोधनाव्दारे अशा प्रकारची माहिती मिळवली जाते.

2) व्दितीयक स्त्रोत:- संशोधक प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जावुन माहिती संकलित करीत नसुन विषयाशी संबंधीत माहिती विविध संदर्भ ग्रंथ, ग्रंथालय, सांख्यकीय माहिती अहवाल आधारे संकलित करतो अशा माहितीचा समावेष व्दितीय स्त्रोतात होतो यामधील वैयक्तीक व सार्वजनिक प्रलेखाव्दारे माहिती संकलित केली जाते.

11. **तथ्याचे वर्गीकरण**:-

संशोधनासाठी संशोधकाने संकलित केलेली तथ्ये अस्पष्ट विस्तृत असताव्यस्त स्वरुपात असतात अशा विस्तृत व विखुरलेल्या तथ्याच्या आधारे विश्लेशन करणे कठीन कार्य असते. तथ्याचे विश्लेशन सुलभ करण्यासाठी तथ्यामधील समान व असमान बाबीवर वर्गीकरण करण्यात येणार आहे या वर्गीकरणामुळे माहितीतील व्यवस्थितपणा येणार आहे.

12. **तथ्याचे विश्लेषण**:-

प्रस्तुत संशोधनात मुलाखत अनुसुचीच्या आधारे तथ्य संकलित केल्यानंतर त्यांचे सांकेतीककरण करण्यात येणार आहेत. समान गुण वैश्टियाच्या आधारे तथ्याचे वर्गीकरण करुन सारणीमध्ये मांडणी करण्यात येणार आहे ही प्रक्रिया करुन तथ्यामध्ये असणाऱ्या सहसंबंधीचा अभ्यास करुन त्यानंतर निस्कर्ष काढण्यात येणार आहे.

त्यानंतर सारणीकरणातील तथ्यांना व्यवस्थितपणे दर्शविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी विविध प्रकारच्या आलेखांचा व नकाशांचा वापर करण्यात येणार आहे.

13. **प्रकरण रचना** :-

1) **प्रस्तावना**

2) **संशोधन पद्धती व साहित्य सर्वेक्षण**

3) **वैयक्तीक माहिती** :- कोरोना ग्रस्ताची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती :-

"कोरोना-19 चा भारतीय समाजावर परिणाम: एक समाजशास्त्रीय अध्ययन या अध्यन" विषयासंबंधी प्रत्यक्ष क्षेत्रीय अध्ययन करुन संकलित झालेल्या तथ्यावरुन कोरोना ग्रस्तांच्या कौटुंबिक सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे सविस्तर विश्लेषन तथ्य संकलनावर आधारीत करण्यात येईल.

4) **कोरोना ग्रस्ताची शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थिती**:-

तथ्य संकलनावर आधारीत प्रस्तुत संशोधनात सदरील प्रकरणामध्ये कोरोना ग्रस्तांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीचे सविस्तर विवेचन करण्यात येईल. शैक्षणिक स्थितीच्या संदर्भात कुटुंबातील व्यक्तीचे शैक्षणिक प्रमाण, वास्तव स्थिती त्याचबरोबर आरोग्य विषयक स्थिती याचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

5) **कोरोना ग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी शासकीय योजना व सेवाभावी संस्थाच्या भुमिकांचा आढावा**:- प्रस्तुत प्रकरणामध्ये कारोनाग्रस्तांच्या पुर्नवनासाठी राबविलेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यात येईल तसेच कारोनाग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी मराठवाडयातील सेवाभावी संस्थाच्या भुमिकांचा आढावा घेण्यात येईल.

6) निष्कर्ष/सुचना/उपाययोजना:- सदरील प्रकरणामध्ये साहित्य सर्वेक्षणात प्राप्त झालेली माहिती तसेच उपरोक्तच्या तिन्ही प्रकरणात प्रत्यक्ष क्षेत्रीय अध्ययनातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येईल आणि संशोधनासाठी सुचवण्यात आलेल्या उदीष्टाचा आणि ग्रृहीतकृत्याचा आढावा निष्कर्षात घेवुन ग्रहीतकृत्याची सिद्धता पडताळुन पाहण्यात येईल. त्याचबरोबर या समस्येचया संदर्भात काही सुचनाव्दारे समस्या निर्मुलनासाठी उपाय योजना व शिफारसी सुचविण्यात येतील.

संदर्भग्रंथसुची:-

1. आगलावे प्रदीप-भारतीय समाज प्रश्न आणि समस्या -2001- श्री साईनाथ प्रकाशन नागपुर
2. काचोळे दा.धो.- समाजशास्त्रीय संकल्पनात्मक ओळख- -2002- कैलास पब्लीकेशन औरंगाबाद
3. खैरनार दिलीप-आधुनिक भारतातील सामाजिक समस्या-2004- चिन्मय प्रकाशन औरंगाबाद
4. नाडगोंडे गुरुनाथ- सामाजिक संशोधन पद्धती-1988- भडके प्रकाशन कोल्हापुर
5. भांडारकर पु.ल.- सामाजिक संशोधन पद्धती-1976- हातसंग प्रकाशन नागपुर
6. वाघमारे सुरेश-वैद्यकीय समाजशास्त्र-1993- कल्पना प्रकाशन नांदेड
7. राम आहुजा- सामाजिक अनुसंधान- 2008-रावत पब्लीकेशन जयपुर
8. मुखर्जी रविंद्रनाथ व अग्रवाल-2008- भारतीय सामाजिक व्यवस्था- विवेक प्रकाशन दिल्ली
9. https://hiwikipedia.org
10. www.corona.com
11. www.coronausa.com

12. www.coronpumps.com

13. www.coronadenture.com

14. www.corona-travel.com

15. www.coronproject.co.uk

-संशोधक -
श्री सुबोधकुमार चंद्रकांत सुर्यकर
एम.ए.(समाजशास्त्र)
माता गुजरीजी नगर नमस्कार चौक नांदेड
ता.जि.नांदेड

-मार्गदर्शक -
चव्हाण सुखदेव गोविंदराव
एम.ए.एफ.फिल, पीएच.डी. (समाजशास्त्र)
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता.पालम जि.परभणी